# उत्कृष्ट तापास

उत्कृष्ट तापास

TIMES OF INDIA Date 31 July, 2019

# Crime branch arrests 2 for stealing 27 vehicles

TIMES NEWS NETWORK

**Pune:** The crime branch on Monday arrested two men for their involvement in more than 45 cases of vehicle theft and seized 27 stolen motorcycles from them.

The suspects have been remanded in police custody till August 6.

Senior inspector Datta Chavan, in charge of crime branch (unit V), said they received information that a gang of four men was involved in forging vehicles' documents and selling them at throwaway prices. "A team headed by sub-inspector Somnath Shendge intercepted two men — Shubham Bhandare (25) of Latur and Chetan Hingmire (26) from Kalepadal — for riding a motorcycle without a number plate," Chavan said.

When the police entered the vehicle's engine and chassis numbers in a mobile app, they found that the motorcycle was reported stolen from Parbhani — an FIR had been registered with the New Modha police. "During questioning, the suspects admitted to being a part of a four-member gang that would steal and sell vehicles for a quick buck," deputy commissioner of police (crime) Bachchan Singh said.

"We have seized 27 motorcycles, totally worth Rs9.65 lakh, from them," Singh added. The police have fanned out teams to track down and arrest the other two members of the gang. "The vehicles were stolen from Pune, Pimpri Chinchwad, Pune rural, Solapur, Latur, Parbhani, Nanded and Mukhed," Singh said.

"Hingmire would forge documents of the vehicles in a cyber café, while his accomplices used these documents and sold the vehicles to their accomplices for Rs2,000 and Rs3,000," senior inspector Chavan said.

## ABOUT THE SUSPECTS



**Shubham Bhandare** comes from family of labourers

- He does not have a criminal background
- He met his three accomplices at a catering firm
- They decided to form a gang to steal vehicles

**Chetan Hingmire**'s family moved to Pune after they fell on hard times

- He is an alcoholic and an inveterate gambler
- Hingmire was the brain behind the gang
- Police said Hingmire forced his parents to sell their property and wasted the money

## 44-year-old from Punjab held for stealing three vehicles

**Pune:** The Alankar police on Sunday arrested a 44-year-old man from Punjab for stealing a sedan from Karvenagar a month ago.

Police said the suspect stole the vehicle and used it as a makeshift residence. The police also recovered a pickup van and a scooter, which the suspect had stolen from Warje and Kothrud, respectively. Police pegged the value of the three vehicles at Rs6 lakh. Sub-inspector Suraj Gore of the Alankar police said the suspect had come to Pune to live with his sister. However, after an argument, the suspect left her house.

As he had nowhere else to go, police said, the suspect stole the sedan, changed its number plate and started sleeping in the vehicle. The police, while investigating a complaint of a stolen sedan in Karvenagar, received information that the car was parked near Jit ground in Kothrud. "A team led by senior inspector Kalpana Yadav took the suspect into custody," Gore said.

— Mihir Tanksale

TIMES OF INDIA Date 18 July, 2019

# Three 'Koyta' gang members wanted for 30 robberies held

## They Were Arrested From Khed Shivapur

TIMES NEWS NETWORK

**Pune:** The Pune police crime branch on Tuesday arrested three members of 'Koyta' (sickle) gang for their involvement in 30 robberies across the city and rural areas, besides Pimpri Chinchwad, this year.

They were wanted in three cases under the Maharashtra Control of Organised Crime Act (MCOCA) registered with Pune and Pune rural police.

The trio, riding triple seat on a motorcycle, were arrested from Khed Shivapur on Tuesday following a tip-off received by policemen Anil Shinde and Pravin Tapkir.

Additional commissioner of police (crime) Ashok Morale said, "The gang's arrest has helped us to register five robbery cases, including two at Kondhwa, and one each at Hinjewadi, Alankar and Swargate police stations. We have recovered a stolen motorcycle, two sickles, seven smartphones, cash Rs13,710, mask, jacket, monkey cap and a helmet, collectively worth Rs1.04lakh from them." Those arrested are Nitin Metkari (24), Kuldeep Walmiki (24) and Pratik Yevale (23). Deputy commissioner of police (crime) Shirish Sardeshpande said, "Metkari was wanted in a case under MCOCA lodged with Dattawadi police. He was wanted in six robberies. Yevale was wanted in an MCOCA case registered with Paud police. The crime branch (unit V) had earlier arrested him for his involvement in 24 robberies."

"Walmiki was wanted in two cases under the MCOCA registered with Haveli and Paud police stations. He was also wanted in 11 robbery cases," he added.

Sardeshpande said, "The gang members have committed a series of offences like dacoity, kidnapping and robbery since 2016. Metkari, Yewale and Walmiki are criminals on record since 2009, 2015 and 2016."

Assistant commissioner of police (crime) Sameer Shaikh said, "The gang used to initially operate individually. Their questioning has revealed that they decided to work jointly at the behest of criminal on record Sunil, alias Sunya alias Chocolate Dokephode, in order to earn a fast buck. We are collecting information about the crimes committed by them in Pune rural areas."

Senior inspector Rajendra Mokashi of crime branch (unit III) said, "We had launched a hunt for arresting absconding and wanted criminals on the run. Our teams, while working on certain clues, received information about the gang. We took them into custody and their questioning revealed that they were wanted in many cases at various places."

### ON THE RUN

- A three-member gang was actively operating in Pune, Pune rural and Pimpri Chinchwad
- They used a stolen motorcycle to commit a series of crimes
- They robbed victims of valuables and cash after threatening them with koyta
- The gang members committed offences like dacoity, kidnapping and robbery since 2016
- They used to operate individually but they started operating jointly at the behest of criminal on record Sunil alias Sunya alias Chocolate Dokephode
- Police received information about the gang while they were working on certain clues
- The gang was arrested after a hunt was launched to arrest absconding and wanted criminals involved in serious crimes
- Police have recovered a stolen motorcycle, two sickles, seven smartphones, cash ₹13,710, mask, jacket, monkey cap and a helmet, collectively worth ₹1.04 lakh, from them



They were wanted in three cases under the Maharashtra Control of Organised Crime Act registered with Pune and Pune rural police

पुढारी – दि. ०७ जुलै, २०१९

# दुचाकी दुरुस्त केली अन् फिरवलीही!

## ३ वर्षांनंतर गुन्ह्याची उकल

**पुणे : प्रतिनिधी**

शहरातून दररोज ५ ते ६ वाहने चोरीला जातात. अशीच एक दुचाकी रस्त्यावर सापडलेली एकाने दुरुस्त केली अन् तिचा वापरही सुरू केला, परंतु तीन वर्षांनंतर सदर दुचाकीस्वार पोलिसांच्या कचाट्यात सापडला अन् गुन्ह्याची उकल झाली.

शहरात ४० लाखांहून अधिक वाहने आहेत. पार्किंग केलेली वाहने चोरटे अलगद चोरी करतात. पण, त्यांचा थांगपत्ता काही लागत नाही. चतु:श्रृंगी पोलिस ठाण्यातील सुशील लोणकर, सचिन पवार व अनिल शिंदे हे हद्दीत पेट्रोलिंग करत होते, या वेळी एकजण हिरोहोंडा स्प्लेंडर दुचाकीवरून संशयितरीत्या जाताना दिसला. यामुळे त्यांनी त्याला थांबविले. तसेच, कागदपत्रांची चौकशी केली. या वेळी त्याने सफाईदारपणे कागदपत्रे घरी असून जुनी गाडी विकत घेतल्याची माहिती दिली. पण, पोलिसांना त्याच्यावर संशय आला. यामुळे त्याला ताब्यात घेऊन चौकशी केली. स्वरूप जयशंकर पंडित (आंबेगाव बुद्रुक) असे त्याचे नाव आहे. त्याला रस्त्यावर दुचाकी सापडली होती, यामुळे घेतली आणि ती दुरुस्ती करून वापरत असल्याचे पंडित याने सांगितले.



दुचाकीबाबत माहिती घेतल्यानंतर याप्रकरणी २०१६ मध्ये चतु:श्रृंगी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल असल्याचे समोर आले आहे. पोलिसांकडून याबाबत चौकशी करण्यात येत आहे.

# कर्नाटकातील महिलेचा खून करून फरार झालेल्यांना बेड्या

**पुणे : प्रतिनिधी**

विजापूर- कर्नाटक येथील एका महिलेचा हुंड्यासाठी खून करून फरार झालेल्या आरोपींना पुणे पोलिसांनी जेरबंद केले. परवीन आश्पाक कालेकोटे (वय ३६) असे खून झालेल्या महिलेचे नाव आहे. याप्रकरणी विजापूर येथील गांधी चौक पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी पती आश्पाक कालेकोटे (वय ४६) याला पोलिसांनी यापूर्वीच अटक केली आहे. मात्र इतर चौघे खून झाल्यापासून फरार होते.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, खून झालेली महिला ही आश्पाकची तिसरी पत्नी होती. खुनाची घटना अतिशय अमानुष असल्यामुळे परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. आरोपींना तत्काळ अटक करावी म्हणून स्थानिक लोकांनी मोर्चे काढले होते; त्यामुळे कर्नाटक पोलिसांवर मोठा दबाव होता. हुंड्याच्या कारणावरून पती आश्पाकसह अलताफ, फकरुद्दीन, रहमत, आसमा यांनी संगनमताने परवीन यांचा ८ जूनला अमानुषरीत्या खून केला होता. तेव्हापासून पोलिस आरोपींचा शोध घेत होते. तपासात आरोपी पुण्यातील नातेवाइकांकडे राहत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार कर्नाटक पोलिसांनी वानवडी पोलिसांशी संपर्क साधून घटनेची माहिती दिली. त्यानुसार वानवडी पोलिस आरोपींचा शोध घेत असताना सय्यदनगरमध्ये आरोपीचा भाऊ अलताफ कालेकोटे नातेवाइकांकडे मिळून आला.

पोलिस तपासात त्याने इतर आरोपी रामटेकडी भागात असल्याची माहिती दिली. त्यानुसार पोलिसांनी घटनास्थळी जाऊन आरोपींचा शोध घेतला असता अटकेच्या भीतीने इतर आरोपींनी तेथून पळ काढला होता. त्यानंतर आरोपी कोंढव्यातील कौसरबाग परिसरात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. पोलिसांनी सापळा रचून फकरुद्दीन कालेकोटे, रहमत कालेकोटे, आसमा कालेकोटे यांना अटक केली. संबंधित आरोपींची वानवडी पोलिस स्टेशन डायरीला नोंद करून पुढील तपासासाठी चारही आरोपींना कर्नाटक पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. ही कामगिरी वरिष्ठ पोलिस निरीक्षक क्रांतीकुमार पाटील, पोलिस निरीक्षक सलीम चाउस, बाबासाहेब करचे, प्रतीक लोहगुडे, शिरीष गोसावी, नीतेश पुंडे, सुदर्शन म्हांगरे, अजिंक्य नानगुडे, सुधीर सोनवणे, नासिर देशमुख, सागर नवले यांच्या पथकाने केली.

# घरफोडीचा माल आई-वडिलांच्या चरणी

## सराईतास अटक : गर्दच्या नशेत गुन्हे

**माता-पिताही भोगत आहेत कारागृहात शिक्षा**

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. २२ -** गुन्हे शाखा युनिट-४च्या पथकाने एका सराईत घरफोड्यास अटक केली. तो अल्पवयीन असल्यापासून घरफोडी करत आहे. विशेष म्हणजे, तो चोरीचा सर्व माल आई-वडिलांना देत असे. त्याचे आई-वडील सध्या घरफोडीच्या गुन्ह्यात कारागृहात शिक्षा भोगत आहेत.

रोहीत नानासाहेब लंके (२०, रा.कस्तुरबा वसाहत, विश्रांतवाडी) असे आरोपीचे नाव आहे.



## आधी दुचाकी चोरी नंतर घरफोडी

रोहीत हा घरफोडीसाठी आधी दुचाकीची चोरी करत असे. त्यावरुन तो घरफोडीसाठी जात असे. विशेष म्हणजे त्याच्या आई-वडिलांवरही घरफोडीचे गुन्हे दाखल आहेत. रोहितला गर्दची नशा असून तो नशा करुनच घरफोडीसाठी जात असे. पोलिसांनी अनेकदा त्याचे समुपदेशनही केले होते. मात्र, त्याच्या वर्तवणुकीत कोणताच फरक पडला नाही. दरम्यान, युनिट-४चे पथक सराईतांचा शोध घेत असताना पोलीस उपनिरीक्षक नीलेशकुमार महाडिक व पोलीस हवालदार राजु मचे यांना रोहीत लंकेने पाच दिवसांपूर्वीच सुरेखा कम्युनिकेशन येथून दुचाकी चोरुन औंध येथे घरफोडी केल्याची माहिती मिळाली. त्यानुसार त्याला विश्रांतवाडी परिसरात सापळा रचून ताब्यात घेण्यात आले. त्याने केलेल्या गुन्ह्याचे सीसीटीव्ही फुटेजही पोलिसांना सापडले आहेत. चतुःशृंगी पोलीस ठाणे हद्दीतील घरफोडीतील १२० ग्रॅम सोन्याचे दागिने तसेच दुचाकी असा ३ लाख २५ हजारांचा ऐवज त्याच्याकडून हस्तगत करण्यात आला आहे.

ही कारवाई अपर पोलीस आयुक्त अशोक मोराळे, पोलीस उपायुक्त बच्चनसिंग, सहायक पोलीस आयुक्त भानुप्रताप बर्गे, पोलीस निरीक्षक अंजुम बागवान यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक नीलेश महाडिक, पोलीस कर्मचारी राजू मंचे, शंकर पाटील, गणेश साळुंके, दत्तात्रय फुलसुंदर, गणेश काळे, विशाल शिर्के व राकेश खुनवे यांच्या पथकाने केली.

**पुढारी** – दि. ०५ जुलै, २०१९

# जबरी चोऱ्यांसह घरफोडी करणारी टोळी गजाआड

- विविध पोलिस ठाण्यांतील अकरा गुन्हे केले उघड
- वानवडी पोलिसांची कामगिरी

**पुणे : प्रतिनिधी**

दुचाकी चोरून शहरातील विविध भागात जबरी चोऱ्यांसह घरफोडी करणाऱ्या तिघांच्या टोळीला वानवडी पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. मौजमजा आणि मद्यपान करण्यासाठी शहरासह पुणे ग्रामीण पोलिस ठाण्याच्या हद्दीसह जामखेड परिसरात आरोपी चोऱ्या करत होते. ओंकार विनोद मासाळ ऊर्फ हर्षद सलीम शेख (वय २०, रा. शेवाळवाडी, हडपसर), किरण ऊर्फ जॉय मॅनवल रुपटके (वय २१, रा. हडपसर, मूळ- श्रीरामपूर, नगर) आणि स्वप्निल नागनाथ बोधले (वय १९, रा. काळेपडळ, हडपसर) अशी अटक करण्यात आलेल्या तिघांची नावे आहेत. यावेळी आरोपींच्या ताब्यातून चार दुचाकी, एक मोटार, सहा मोबाईल, १० हजारांची रोकड मिळून ५ लाख ८७ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. यावेळी शहरातील अकरा गुन्ह्यांची उकल करण्यात पोलिसांना यश आले आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, वानवडी पोलिसांच्या हद्दीतील एका महाविद्यालयाजवळ तिघे जण दुचाकी घेऊन संशयास्पदरीत्या फिरत असल्याची माहिती पोलिस कर्मचारी नासीर देशमुख व सुधीर सोनवणे यांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून तिघांना ताब्यात घेतले. त्यानंतर त्यांच्याकडे ताब्यातील दुचाकीची चौकशी केली असता त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली. चौकशीत त्यांच्याकडील दुचाकी चोरीची असल्याचे निदर्शनास आले. त्यांच्याकडे सखोल तपास केला तेव्हा त्यांनी वानवडी, कोंढवा, हडपसर, मार्केट यार्ड, खडक, शिक्रापूर, जामखेड परिसरातून वाहनचोरी, जबरी चोरी, घरफोड्या केल्याचे निष्पन्न झाले. यातील आरोपी ओंकार मासाळ हा आर्म ॲक्ट गुन्ह्यातील फरारी असल्याचे पोलिसांनी सांगितले.

सदरची कामगिरी उपायुक्त सुहास बावचे, सहायक पोलिस आयुक्त सुनील देशमुख, वरिष्ठ निरीक्षक क्रांतिकुमार पाटील, गुन्हे निरीक्षक सलीम चाऊस, उपनिरीक्षक राजेंद्र गायकवाड, रमेश भोसले, राजू राजगे, योगेश गायकवाड यांच्या पथकाने केली.

### सीसीटीव्हीत दिसला अन् गजाआड झाला

कोंढव्यातील एका गुन्ह्यासंदर्भात सीसीटीव्हीचे फुटेज सर्व पोलिस ठाण्यांना पाठवण्यात आले होते. त्यानुसार एका संशयिताला ताब्यात घेतले होते. त्याने दिलेल्या माहितीनुसार इतर दोघांना पोलिसांनी अटक केली. यावेळी त्यांनी शहरातील विविध भागात घरफोड्यांसह जबरी चोऱ्या केल्याची कबुली दिली.

### तिघेही रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार

अटक करण्यात आलेल्या तिघांमधील दोघे अल्पवयीन असल्यापासून गुन्हेगार आहेत. त्यामुळे तिघेही पोलिस रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार असून, त्यांच्यावर गंभीर गुन्ह्यांची नोंद आहे.

**पुढारी** – दि. ०९ जुलै, २०१९

# व्यापाऱ्यानेच रचला होता मदतीने दरोड्याचा बनाव

- महिती देताना चुकला अन् पोलिसांच्या जाळ्यात अडकला
- कर्जाची परतफेड करण्यासाठी सुपीक डोक्यात आली कल्पना

**पुणे : प्रतिनिधी**

कात्रज चौकात दुचाकीवरून आलेल्या दोघांनी एका व्यक्तीच्या डोळ्यांत मिरचीपूड टाकून त्याच्या बॅगेतील पाच लाखांची रोकड लुटल्याचा प्रकार रविवारी (दि. ७) रात्री आठच्या सुमारास घडला होता. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तत्काळ आरोपीच्या मुसक्या आवळण्यासाठी तपास सुरू केला; मात्र तपासाअंती ज्या व्यापाऱ्याला लुटले होते त्यानेच इतर दोन साथीदारांच्या मदतीने आपल्याला लुटल्याचा बनाव रचल्याचे समोर आले.

कल्याणसिंग ज्ञानसिंग राजपुरोहित (२९, रा. खेडशिवापूर) असे बनाव रचणाऱ्या व्यापाऱ्याचे नाव आहे. याप्रकरणी भारती विद्यापीठ पोलिसांनी मुख्य सूत्रधार व्यापाऱ्यासह अर्जुन प्रेमजी बंजारा (वय ३५, रा. खेडशिवापूर), प्रकाश रूपसिंग राजपुरोहित (वय २३, रा. दत्तनगर आंबेगाव) यांना अटक केली. या वेळी त्यांच्या ताब्यातून चोरीची पाच लाखांची रोकडदेखील पोलिसांनी जप्त केली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, खेडशिवापूर येथे कल्याणसिंग राजपुरोहित याचे मिठाईचे दुकान आहे. मागील काही दिवसांपासून त्याचा व्यवसाय मंदीत होता. दुकानाला तीस हजार रुपये भाडे असून, ते भरण्यासाठीदेखील त्याच्याकडे पैसे नव्हते. कल्याणसिंग हा काही कामानिमित्त पुण्याला निघाला होता. त्या वेळी शेजारच्या किराणा दुकानदार रमेश चौधरी यांनी कल्याणसिंगला दोन व्यापाऱ्यांना देण्यासाठी रक्कम दिली. कल्याणसिंगने नवले ब्रीज येथे कोथरूडच्या व्यापाऱ्याचे अडीच लाख रुपये दिले. त्यानंतर कोंढव्याचे व्यापारी प्रकाश पाटील यांना ५ लाख रुपये देण्यासाठी जात असताना कात्रज चौकातील उड्डाण पुलाखालील सेवा रस्त्यावर कल्याणसिंग आला असता समोरून दोन दुचाकींवरून तिघेजण आले. त्यांनी कल्याणसिंगच्या डोळ्यांत मिरचीपूड टाकून त्याच्याकडील ५ लाख रुपये लुटून ते चोरटे कात्रज-कोंढवा रस्त्याने पळून गेले. कल्याणसिंगने याची माहिती तातडीने पोलिस नियंत्रण कक्षाला दिली. त्यानुसार पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत तपासाला सुरुवात केली. मात्र, यात पोलिसांना संशय आल्याने भारती विद्यापीठ पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक विष्णू पवार व गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक विष्णू ताम्हाणे यांनी त्याच्याकडे कसून चौकशी केली. तेव्हा त्यानेच लुटीचा बनाव रचल्याची कबुली दिली.सदरची कामगिरी, वरिष्ठ निरीक्षक विष्णू पवार यांच्या मार्गदर्शनात उपनिरीक्षक महेंद्र पाटील, कर्मचारी श्रीधर पाटील, कृष्णा बढे, गणेश सुतार, उज्ज्वल मोकाशी, प्रवीण संकपाळ, सचिन पवार यांच्या पथकाने केली.

### बोलण्यात हुकला अन् तुरुंगात गेला

आपल्याला लुटल्याची माहिती जेव्हा कल्याणसिंगने पोलिसांना दिली; मात्र त्यात त्यांना मोठी विसंगती आढळली. त्यामुळे पोलिसांच्या मनात संशयाची पाल चुकचुकली. त्यानुसार त्यांनी तपास करून पोलिसी खाक्या दाखवताच व्यापारी पोपटासारखा बोलू लागला. तसेच मिरचीपूड टाकल्यानंतर त्याचे डोळेदेखील लाल झालेले नव्हते. त्यामुळे पोलिसांना त्याच्यावर जास्तच संशय आला. शेवटी त्यानेच हा बनाव रचल्याचे पोलिसांना सांगितले.

**पुढारी** – दि. १२ जुलै, २०१९

# अटक करण्यात आलेल्या सराइतांकडून २६ दुचाकी जप्त

पुणे : बुधवारी अटक करण्यात आलेल्या दोघांकडून चोरीच्या २६ दुचाकी गुन्हे शाखेच्या युनिट दोन आणि युनिट तीनच्या पथकाने जप्त केल्या आहेत. संतोष शिवराम घारे (वय-३३, रा. ओझर्डे, ता. मावळ), रवींद्र सखाहारी कानडे (वय-३८, रा. कोल्हार, अहमदनगर) अशी दोघांची नावे आहेत, असे पोलिसांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

संतोष घारे याने शिवाजीनगर, लष्कर, बंडगार्डन, चतु:शृंगी, बिबवेवाडी तसेच इंदापूर पोलिस ठाण्याच्या हद्दीतून दुचाकी चोरी केल्याची कबुली दिली आहे. घारे हा १० मे रोजीच जामिनावर सुटला असून, केवळ दीड महिन्याच्या कालावधीत परत त्याने १४ दुचाकी चोरल्या आहेत.

दुसरा आरोपी रवींद्र यानेदेखील अहमदरगर, संगमनेर, पुणे, पिंपरी या परिसरात वाहन चोरी केल्याची कबुली दिली आहे. या वेळी पोलिसांनी त्याच्याकडून १२ गुन्ह्यांची उकल केली आहे. सदरची कामगिरी अपर पोलिस आयुक्त अशोक मोराळे, उपायुक्त शिरीष सरदेशपांडे, सहायक पोलिस आयुक्त समीर शेख यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षक राजेंद्र मोकाशी, निरीक्षक गजानन पवार, उपनिरीक्षक संजय गायकवाड, राजकुमार केंद्रे, नितीन शिंदे, किरण अडागळे, कर्मचारी मच्छिंद्र वाळके यांच्या पथकाने केली.

**लोकमत** – दि. ०९ जुलै, २०१९

# चोरी गेलेले ३० मोबाईल केले परत

लोकमत न्यूज नेटवर्क

सहकारनगर : अपर पोलीस आयुक्त श्रीकांत तरवडे यांनी ३० मोबाईल नागरिकांना केले परत केले. स्वारगेट पोलीस स्टेशन येथे परिमंडळ - ०३ चे पोलीस उपायुक्त बच्चन सिंह, स्वारगेट विभागाचे सहायक पोलीस आयुक्त डॉ. प्रीती टिपरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक कदम, पोलीस निरीक्षक शब्बीर सय्यद यांच्या मार्गदर्शन घेऊन पोलीस उपनिरीक्षक समाधान कदम, पोलीस नाईक मंगेश बोराडे, सचिन दळवी, शैलेश वावळे यांनी चालु स्थितील ३० मोबाईल तांत्रिक तपास करुन शोध घेऊन नागरिकांना परत केले आहेत.

प्रभात – दि. १९ जुलै, २०१९

# फसवणुकीतील साडेतीन कोटी मिळाले

## सायबर पोलिसांची कामगिरी : बनावट मेलद्वारे केली होती फसवणूक

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. १८ -** पुण्यातील कंपनीला ३ कोटी ४१ लाख रुपये मिळवून देण्यास सायबर पोलिसांना यश आले आहे. येथील कंपनीने मेक्सिको येथील एका बँकेत ३ कोटी ४१ लाख रुपये ई-मेलद्वारे पाठविले. ज्या ई-मेलद्वारे पाठविले. तो ई-मेल बनावट असल्याचे निदर्शनास आल्यानंतर कंपनीने तातडीने सायबर पोलिसांकडे धाव घेतली. 'मॅन इन मिडल' या 'सायबर फ्रॉड'द्वारे फसवणुकीच्या प्रकारात सायबर पोलिसांनी त्वरित कारवाई केल्याने कंपनीला ही रक्कम पुन्हा मिळाली. सायबर पोलीस ठाण्याने यापूर्वी अशाच प्रकारामध्ये पुण्यातील एका नामांकित कंपनीला त्यांचे ४ कोटी ५० लाख रुपये परत मिळवून दिले होते.

**पुण्यातील एका कंपनीने घेतली होती सायबर पोलिसांकडे धाव**

याबाबत पोलिसांनी सांगितले की, एस.आर.सी. केमिकल कंपनीने १४ जून रोजी १ लाख ६६ हजार २७६ डॉलर आणि १८ जून रोजी ३ लाख २९ हजार ४०५८५ डॉलर एचडीएफसी बँकेतून मेक्सिको येथील बँको मर्केंटाईल टेल नॉर्टे (बेनॉर्टे) बँकेमध्ये भारतीय चलनामध्ये ३ कोटी ४१ लाख रुपये पाठविले होते.

ही रक्कम पाठविल्यानंतर ज्या ई मेलद्वारे रक्कम पाठविली तो ई मेल बनावट असल्याचे निदशर्नास आले. त्यामुळे फसवणूक झाल्याचे लक्षात आल्याने कंपनीने सायबर पोलीस ठाण्यात २० जूनला तक्रार दाखल केली होती.

ही तक्रार मिळताच सायबर पोलिसांनी तत्काळ मेक्सिको येथील बँकेला, तक्रारदार यांचे अकाऊंट असणाऱ्या एचडीएफसी बँक तसेच स्वीफ्ट ट्रान्झॅक्शन जे पी मॉर्गन बँकेमार्फत झाल्याने त्यांना घडलेल्या घटनेबाबत



आणि ही ट्रॅन्झॅक्शन फसवणुकीने झाल्याबाबत पुराव्यासहीत पत्रव्यवहार करुन त्याचा पाठपुरावा केला. या प्रयत्नांमुळे ११ जुलै रोजी फसवणूक झालेली ३ कोटी ४१ लाख रुपये बँकेकडून एस.आय.सी केमिकल कंपनीला रिफंड करण्यात येणार असल्याचे पत्रव्यवहार करुन कळविले आहे. या कामगिरीनंतर अधिकाऱ्यांनी पोलीस आयुक्त डॉ. के व्यंकटेशम यांची भेट घेऊन कामगिरीबद्दल त्यांचे अभिनंदन केले.

पोलीस उपायुक्त संभाजी कदम, सहायक पोलीस आयुक्त नीलेश मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जयराम पायगुडे, सहायक निरीक्षक सागर पानमंद, प्रसाद पोतदार यांनी केली ही कारवाई केली.

# चोरी करणारा सुरक्षा रक्षक अवघ्या ४ तासांत जाळ्यात

## बंडगार्डन आयनॉक्स थिएटर येथील घटना

**पुणे, दि. १५** - आयनॉक्स थिएटरच्या कॅश काऊंटरमधून दीड लाख रुपयांची रोकड तेथील सुरक्षा रक्षकाने चोरुन नेली. ही घटना सीसीटीव्हीमध्ये कैद झाल्यानंतर व्यवस्थापनाने बंडगार्डन पोलिसांकडे तक्रार दाखल केली. तक्रार दाखल होताच अवघ्या चार तासात संबंधित सुरक्षारक्षकास बेड्या ठोकण्यात आल्या. त्याच्याकडून चोरलेली रोकड हस्तगत करण्यात आली.

आतिश उद्धव कांबळे (२४, रा. मुंढवा) असे अटक आरोपीचे नाव आहे. आयनॉक्स थिएटरच्या दुसऱ्या मजल्यावर कॅश काऊंटर आहे. येथे रूममधील तिजोरीत ठेवलेली १ लाख ५६ हजार रुपयांची रोख रक्कम कॅशिअरची नजर चुकवून तेथे सिक्युरिटीचे काम करणाऱ्या आतिशनचे पळवले होती. ही रोकड तो शर्टच्या आत टाकून पळून गेला होता. हा सर्व प्रकार सीसीटीव्हीत कैद झाल्यानंतर व्यवस्थापक अंकुर कटपाल यांनी बंडगार्डन पोलिसांत गुन्हा दाखल केला. दरम्यान, आरोपी त्याच्या घरी येणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार तो बी.जी. शिर्के कंपनीजवळ असतानाच पोलिसांनी त्याला पैशांसह ताब्यात घेतले.

ही कामगिरी सहायक पोलीस निरीक्षक संदीप जमदाडे, फिरोज शेख, नवनाथ रावडांगे, संतोष पगार, हरीष मोरे, अय्याज दड्डीकर, कैलास डुकरे, श्रीधर सानप, निखील जाधव यांच्या पथकाने केली.

महाराष्ट्र टाइम्स – दि. १३ जुलै, २०१९

# सहा जणांच्या टोळक्याला अटक

## पंचवीस लाखांची चोरी करणारे २४ तासांत गजांआड



पत्रकार परिषदेत गुन्हे शाखेचे उपायुक्त शिरीष सरदेशपांडे, सहायक आयुक्त समीर शेख, वरिष्ठ निरीक्षक अरुण वायकर उपस्थित होते.

### काही तासांत घटना उघडकीस

मध्य वस्तीत घडलेल्या या प्रकारामुळे व्यापाऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते. पुण्याच्या मध्य वस्तीत अनेक व्यापाऱ्यांची गोडाउन असून, तेथे मोठ्या प्रमाणात माल साठवून ठेवण्यात आलेला आहे. ही घटना घडल्यानंतर स्थानिक पोलिसांसह गुन्हे शाखेने रेकॉर्डवरील गुन्हेगार धुंडाळण्यास सुरुवात केली होती. तसेच, खबऱ्यांमार्फत देखील माहिती गोळा केली जात होती. त्यातूनच अवघ्या काही तासांत ही घटना उघडकीस आणण्यात पोलिसांना यश आले.

म. टा. प्रतिनिधी, पुणे

इलेक्ट्रिक सामानाचे गोडाउन फोडून २५ लाख रुपयांचा मुद्देमाल चोरणाऱ्या सहा जणांच्या टोळक्याला गुन्हे शाखा युनिट एकच्या पथकाने गजांआड केले आहे. ही घटना बुधवार पेठ येथे मंगळवारी पहाटे घडली. या प्रकरणी गुन्हा दाखल होताच सीसीटीव्ही फुटेज आणि तांत्रिक सहायामुळे २४ तासांच्या आत आरोपींना गजांआड करण्यात पोलिसांना यश आले आहे.

अक्षयकुमार श्रीमेवालाल सरोज (वय २०, रा. मंगळवार पेठ, मूळ रा. उत्तर प्रदेश), विनयकुमार विरेंद्रनारायण सरोज (२०, रा. पाटील ईस्टेट झोपडपट्टी, मूळ रा. उत्तर प्रदेश), राहुल रामसजीवन सरोज (१९), निरजकुमार मेपाई सरोज (१९), सुनीलकुमार श्यामसुंदर सरोज (२४) आणि अरविंदकुमार प्यारेलाल सरोज (२०, रा. मंगळवार पेठ, मूळ रा. उत्तर प्रदेश) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत.

गुन्हे शाखेचे उपायुक्त शिरीष सरदेशपांडे, सहायक आयुक्त समीर शेख, वरिष्ठ निरीक्षक अरुण वायकर यांनी ही माहिती शुक्रवारी पत्रकार परिषदेत दिली. बुधवार पेठ येथे मंगळवारी पहाटे गोडाउन फोडल्याचा प्रकार उघडकीस आला होता. तेव्हा पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज ताब्यात घेतले होते. घटना घडल्यानंतर फडके हौद परिसरातून एक टेम्पो दोन वेळा जाताना दिसून आला. पहाटेच्या वेळेस एक टेम्पो दोनवेळा येथून का गेला याची चौकशी युनिट एकच्या पथकाने सुरू केली होती. तेव्हा टेम्पोचा नोंदणी क्रमांक पुसटसा फुटेजमध्ये दिसला होता. त्यावरून पोलिसांनी या क्रमांशी मिळत्या-जुळत्या नोंदणी क्रमांकाच्या पाच जणांकडे चौकशी केली. तेव्हा हा टेम्पो प्रतापगड आणि उत्तर प्रदेशातील लोकांनी चोरून आणला असून, तो गुन्ह्यात वापरल्याचे उघड झाले. चोरी करण्यापूर्वी टेम्पोचा मूळ नोंदणी क्रमांक (एमएच १२ क्यूआर ७८२४) बदलण्यात आला होता. तसेच, टेम्पो चोरीचा असल्याचे समजू नये यासाठी टेम्पोचा रंग देखील बदलण्यात आला होता. त्याच बरोबर चोरट्यांनी गोडाउनमधील सामान चोरून नेताना पुन्हा टेम्पोचा मूळ नोंदणी क्रमांक त्यावर टाकला असल्याचे चालकाच्या चौकशीत उघड झाले. पोलिसांनी गुन्ह्यामध्ये चोरीला गेलेला संपूर्ण मुद्देमालासह टेम्पो, सहा मोबाइल असा एकूण ३० लाख ६० हजार ८७८ हजार रुपयांचा ऐवज जप्त केला आहे.

निरीक्षक अरुण वायकर, फौजदार दिनेश पाटील, उत्तम बदगुडे, हनुमंत शिंदे, सुधाकर माने, रिजवान जिनेडी, श्रीकांत वाघवले, तुषार खडके, इरफान मोमिन आदींच्या पथकाने ही कामगिरी केली.

लोकमत – दि. १५ जुलै, २०१९

# बेपत्ता महिलेच्या मोबाइलवरुन खुनाचा प्रकार उघडकीस

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** मुंढवा येथील बेपत्ता महिलेचा शोध घेत असताना तिचा मोबाईल एका कारमध्ये आढळुन आला. त्यावरुन कारमालकाची चौकशी केली असता त्यानेच कर्ज फेडण्याकरिता संबंधित महिलेच्या गळ्यावर चाकुने वार वरुन खुन केल्याचा प्रकार अखेर उघडकीस आला आहे.कर्जाचे पैसे फेडण्यासाठी एकाने फेसबुकवर फ्रेंड असणा-या महिलेच्या अंगावरील सोने काढून तिचा खुन केल्याची खळबळजनक घटना 22 जुन रोजी ताम्हिणी गावात घडली होती.

याप्रकरणी महिलेच्या मुलाने (वय 19. रा.पिंगळवस्ती) याने फिर्याद दिली आहे. घटनेतील आरोपीला मुंढवा पोलिसांनी अटक केली आहे. आनंद शिवाजी निकम (रा.संतनगर कॉलनी, तापकीर नगर-काळेवाडी) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, घटनेतील महिला 22 जुन पासून बेपत्ता असल्याची तक्रार त्यांच्या मुलाने मुंढवा पोलीस ठाण्यात दिली होती. महिलेचा शोध घेण्याकरिता वरिष्ठ पोलीस निरीक्षक संपतराव भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अमोल गवळी, स्वप्नील पाटील व तपास पथकाने सुरुवात केली. तपासातून हरवलेल्या महिलेचे आरोपी आनंद निकम हे फेसबुक फ्रेंड असल्याची माहिती मिळाली. त्या ओळखीतून त्यांची जवळीक वाढली. ते एकमेकांना भेटत होते. आरोपीने त्याच्यावर कर्ज झाले असून ते मिटवण्यासाठी पैशांची गरज असल्याचे महिलेला सांगितले. त्याप्रमाणे महिलेला संपर्क करुन ताम्हिणी घाटात फोटोग्राफी करण्याकरिता दागिने घालून येण्यास सांगितले. आरोपीने सांगितल्याप्रमाणे महिला दागिने घालून स्वत:च्या दुचाकीवरुन आरोपीला भेटण्याकरिता गेली. त्यानंतर ते दोघे मिळुन ताम्हीणी गावातील एका निर्जन ठिकाणी गेले. तिथे आरोपीने महिलेचे हातपाय दोरीने बांधले. तसेच डोळ्यांना पट्टी बांधली. आणि तिच्या गळ्यावर चायनीच चाकुने वार करुन खुन केला. अशी कबुली आरोपीने दिली.

आरोपीसह घटनास्थळी जाऊन तपास केला असता तिथे महिलेचा कुजलेला मृतदेह मिळुन आला. तो मृतदेह हरवलेल्या महिलेचा असल्याचे आरोपीने सांगितले. घटनेत आरोपीने काही पुरावे नष्ट केले असून तो सध्या पोलिसांच्या ताब्यात आहे.

## युनिट १ ची कारवाई : एकूण ३० लाख ६० हजार ८७८ रुपयांचा मुद्देमाल हस्तगत

# २५ लाखांची घरफोडी करणारा आरोपी जेरबंद

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** बुधवार पेठेत असणाऱ्या एका इलेक्ट्रॉनिक सामानाच्या गोडाऊनमधून २४ लाख ६० हजार किंमतीचे इलेक्ट्रिक सामानाचे बॉक्स चोरणाऱ्या पाच आरोपींना पोलिसांनी अटक केली. युनिट १ च्या पथकाने ही कारवाई केली. या गुन्ह्यातून एकूण ३० लाख ६० हजार ८७८ चा मुद्देमाल हस्तगत केला. याबाबत फरासखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

अक्षयकुमार श्रीमेवालाल सरोज (वय २०), विनयकुमार वीरेंद्रनारायण सरोज (वय २०), राहुल रामसजीवन सरोज (वय २०), नीरजकुमार मेघाई सरोज (वय १९), सुनीलकुमार शामसुंदर सरोज (वय २४), अरविंदकुमार प्यारेलाल सरोज (वय २०, सर्व रा. उत्तर प्रदेश) अशी अटक आरोपींची नावे आहे. याप्रकरणी दीपक रमेश वाधवानी (रा. साधु वासवानी चौक) यांनी फिर्याद दिली होती.

फिर्यादी यांचे बुधवार पेठेत इलेक्ट्रिक सामानाचे गोडावून आहे. हे गोडाऊन बंद असताना ६ ते ८ जुलै रोजी त्यांच्या गोडाऊनच्या खिडकीची फ्रेम तोडून गोडाऊनमधील २४ लाख ६० रुपयांचे इलेक्ट्रिकल सामानाचे बॉक्स चोरले. याप्रकरणी फरासखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. या गुन्ह्याचा तपास गुन्हे शाखा युनिट एकच्या पथकाकडूनही सुरु होता.

दरम्यान तपास पथकातील पोलीस उपनिरीक्षक दिनेश पाटील व पोलीस हवालदार योगेश जगताप, सुधाकर माने यांना आरोपींनी गुन्हा करताना वापरलेला टेम्पो सापडला. त्याच्या चालकाकडे तपास केला असता, त्याने टेम्पोचा वापर त्याच्या उत्तर प्रदेशातील गावाकडील साथीदारांना गुन्ह्यासाठी केला असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार आरोपींना त्याच्या राहत्या घरातून मंगळवार पेठ व पाटील इस्टेट झोपडपट्टीतून ताब्यात घेण्यात आले. त्यांच्याकडून चोरीला गेलेला सर्व माल आणि टेम्पो हस्तगत केला.

अपर पोलीस आयुक्त अशोक मोराळे, पोलीस उपायुक्त शिरीष सरदेशपांडे, सहायक पोलीस आयुक्त समीर शेख, वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरुण वायकर, पोलीस उपनिरीक्षक दिनेश पाटील, उत्तम बुदगुडे, हनुमंत माने, पोलीस कर्मचारी सुधाकर माने, रिजवान जिनेडी, श्रीकांत वाघवले, तुषार खडके, इरफान मोमिन, प्रशांत गायकवाड, योगेश जगताप, तुषार माळ्वदकर, हनिफ शेख, बाबा चव्हाण, अनिल घाडगे, संजय बरकडे, वैभव स्वामी, अशोक माने, सुभाष पिंगळे, अमोल पवार, प्रकाश लोखंडे, सचिन जाधव, अजय थोरात, इमरान शेख यांच्या पथकाने ही कारवाई केली.

### आरोपी गोडाऊनमध्येच होता कामाला



विनयकुमार फिर्यादीच्या गोडाऊनमध्ये वर्षभरापूर्वी कामाला होता. त्यामुळे त्याला गोडाऊनची माहिती होती. कामाच्या ठिकाणी झालेल्या वादाचा राग मनात धरुन त्याने चोरीचा कट रचला. चोरी करण्याकरिता वापरलेल्या टेम्पोचा रंग आणि नंबरप्लेट आरोपींनी बदलली होती. यामुळे सीसीटीव्ही फुटेजमध्ये टेम्पो दिसूनही पोलिसांना माग काढता आला नाही. मात्र, चोरी झाल्यावर पुन्हा मूळ टेम्पोचाच नंबर टेम्पोवर टाकण्यात आला. टेम्पोचा कलर मात्र तोच होता.

# अभिप्राय...

प्रति,

मा. वरीष्ठ पोलीस निरीक्षक सो.
सिंहगडरोड पोलीस स्टेशन, पुणे शहर
यांना सविनय सादर,

प्रतिवेदक :- डी.बी.खेडकर, परि. पोलीस उप-निरीक्षक, सिंहगडरोड पोलीस स्टेशन, पुणे

विषय :- दर्पन पुस्तकासंदर्भात अभिप्रायबाबत.

उपरोक्त विषयान्वये सविनय सादर की, मा. पोलीस आयुक्त सो. पुणे शहर यांनी पोलीस आयुक्तालयातील अधिकारी व कर्मचारी यांनी केलेल्या चांगल्या कामगिरीची माहिती नागरिकांना समजावी या उद्देशाने पोलीस ठाणे येथे दैनंदिनी कामकाज करीत असताना झालेल्या चांगल्या कामगिरीबाबतची प्रेसनोट जनसंपर्क अधिकारी पोलीस आयुक्त कार्यालय पुणे शहर यांचे कार्यालयात सादर करणेबाबत दिलेल्या आदेशाप्रमाणे पोलीस ठाणे येथे आठवडाभरामध्ये झालेल्या चांगल्या कामगिरीची प्रेसनोट सादर करण्यात येत असुन सदरची प्रेस नोट वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द झाल्यानंतर सदरचे पेपर कात्रनाची कटिंग करुन त्या पासुन दर्पन हे पुस्तक तयार करण्यात आले आहे. सदरचे पुस्तक हे ठाणे अंमलदार कक्षामध्ये ठेवण्यात येत असुन पोलीस ठाणे येथे येणारे नागरिकांना सदरचे पुस्तक वाचण्यासाठी देण्यात येत असते.

दर्पन या पुस्तकामुळे पोलीस आयुक्तालयातील अधिकारी व कर्मचारी यांनी केलेल्या चांगल्या कामगिरीची माहिती एकत्रीतपणे वाचण्यासाठी उपलब्ध झालेली असुन दर्पन पुस्तक वाचल्यानंतर नागरिक हे पोलीसांचे चांगल्या कामाचे कौतुक करत आहे. नागरिकांच्या मनामध्ये पोलीसांविषयी चांगल्या प्रकारची भावना निर्माण होत आहे. तसेच पोलीस कर्मचारी व अधिकाऱ्यांमध्ये चैतन्य निर्माण होवुन सदर पुस्तकामध्ये आपल्याही चांगल्या कामगिरी बाबतची बातमी छापुन यावी या करीता ते चांगल्या उमेदिने काम करीत आहेत.

सदरचा उपक्रम हा पोलीसांबाबतची जनमाणसातील प्रतिमा उंचावण्याकरीता अतिशय प्रभावशाली आहे.

मा. सादर व्हावे,
दि. १८/०६/२०१९

( डी.बी.खेडकर )
परि. पोलीस उप-निरीक्षक
सिंहगडरोड पोलीस ठाणे पुणे शहर.

## गुडवर्क व दर्पण विशेष अंकासंदर्भातील अभिप्राय

यापुर्वी पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी केलेल्या बक्षिसपात्र उल्लेखनीय कामगिरी व्यतिरिक्त त्यांचे दैनंदिन कर्तव्या दरम्यान जनसेवा/लोकसेवेच्या, माणूसकीच्या, सामाजिक सहकार्याच्या भावनेतून केलेल्या प्रामाणिक व चांगल्या कामाची स्वतंत्रपणे नोंद ठेवली जात नव्हती अथवा त्याची वर्तमानपत्रातून प्रसिध्दी होत नव्हती. त्यामुळे पोलीसांनी केलेल्या अशा चांगल्या कामाची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचत नव्हती.

परंतू सध्या पोलीसांनी केलेल्या चांगल्या कामाची (Good Work) स्वतंत्र व नियमितपणे नोंद घेवून त्याबाबत वर्तमान पत्रात, वेबसाईटद्वारे प्रसिध्दी दिली जात आहे. यामुळे आपल्या चांगल्या कामाची नोंद घेऊन, आपले पाठीवर बक्षिसाची थाप टाकली जात असल्याची भावना पोलीसांमध्ये निर्माण होत आहे. यातूनच इतर पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना चांगले काम (Good Work) करण्यासाठी प्रेरणा मिळत असून ते उत्स्फुर्तपणे चांगले काम (Good Work) करून त्याची माहिती सादर करीत आहेत.

पुणे शहरातील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी केलेल्या चांगल्या कामाच्या वर्तमानपत्रातील बातम्यांचे संकलनातून तयार करण्यात आलेला 'दर्पण' हा विशेष अंक ही संकल्पना अत्यंत चांगली आहे. या पुस्तकामुळे पोलीसांनी केलेल्या चांगल्या कामाचा विसर न पडता, अशा चांगल्या कामांचे आठवणींना सतत उजाळा मिळत आहे. दर्पण हा अंक पोलीस ठाणे अभ्यागत कक्षात ठेवण्यात येत असल्याने, पोलीस ठाणेस भेट देणारे नागरिकांना पोलीसांचे चांगल्या कामाची माहिती सहजपणे मिळत आहे. त्यातून नागरिकांमध्ये पोलीसांचे चांगल्या कामाबद्दल विश्वास निर्माण होण्यास व पोलीस दलाची सकारात्मक प्रतिमा उंचावण्यास होण्यास निश्चितपणे मदत होत आहे.

( के.व्ही.खुडे )
पो.हवा.ब.नं. ५६६४,
येरवडा पोलीस स्टेशन, पुणे



# गोळीबार करणारे अटकेत

# गुन्हेगारीकडे वळलेली पावले शिक्षणाकडे

पोलिस अधिकाऱ्याच्या प्रयत्नामुळे अल्पवयीन मुलास शाळेत प्रवेश

# फुलारी यांना छत्रपती शिवाजी महाराज वनश्री पुरस्कार

खाकी वर्दीतल्या निसर्गप्रेमीचा सन्मान

# फसवणूक करणाऱ्या मुंबईतील दोघांना अटक

# नागरिकांच्या तक्रारी स्वीकारणाऱ्या पोलिसांना संवाद कौशल्याचे धडे

# खंडणी प्रकरणातील आरोपींना अटक

# पोलिसांच्या 'सेवा ॲप'ला विद्यार्थ्यांचा...

# Bharosa Cell saves 435...

A total of 435 juveniles and 135 parents were counselled in these last six months.

According to Bharosa Cell officials, the children are counselled so they lose criminal habits and stay away from bad company and get educated. Their parents are counselled to behave properly with their wards and stop their addiction. The officials keep track of these juveniles to wean them away from criminal elements and crimes. The officials said there were 90 children - both boys and girls – whose parents brought them to the unit for counselling as they were not behaving properly, left school, or were addicted to mobile phones or other substances.

# ‘दामिनी पथकातील महिला खऱ्या दबंग’

म. टा. प्रतिनिधी, पुणे

‘शहरातील महिलांची सुरक्षा करण्याचे काम दामिनी पथकातील महिला पोलिस करत आहेत. त्याबरोबरच नागरिकांना त्यांच्या जबाबदारीची जाणीव करून देत आहेत. या महिला पोलिस खऱ्या ‘दबंग’ आहेत,’ अशा शब्दांत अभिनेत्री मृणाल कुलकर्णी यांनी दामिनी पथकातील पोलिसांचे बुधवारी कौतुक केले.

पुणे पोलिस आयुक्तालयात महिलांच्या सुरक्षिततेसाठी स्थापन केलेल्या दामिनी पथकाच्या चौथा वर्धापनदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात कुलकर्णी बोलत होत्या. याप्रसंगी पोलिस आयुक्त डॉ. के. वेंकटेशम, सहआयुक्त रवींद्र शिसवे, अतिरिक्त आयुक्त अशोक मोराळे उपस्थित होते. कुलकर्णी म्हणाल्या, ‘पोलिस नागरिकांच्या सुरक्षेसाठी २४ तास काम करत असतात. अनेकदा पोलिस तुमचे मित्र आहेत, असे नागरिकांना सांगितले जाते. पण आता हा विचार बदलून ‘पोलिस आमचे मित्र आहेत,’ असे आपण सांगितले पाहिजे. कोणतीही घटना घडली की आपण जबाबदारी झटकून केवळ मजा घेतो. पण, पोलिस स्वतः काम करतात आणि समाजालाही त्यांच्या जाबादारीची जाणीव करून देण्याचे काम करतात. समाजात आपण एक आहोत, एकमेकांना मदत केली पाहिजे याची आठवण पोलिस करून देतात. पुण्यातील ज्येष्ठ नागरिक, महिला व लहान मुलांसाठी भरोसा सेल सारखा चांगला उपक्रम पोलिसांनी सुरू केला. तो खुपच चांगला आहे.’

डॉ. व्यंकटेशम म्हणाले, ‘आपल्या कामाचे कौतुक होत असल्याने जबाबदारी वाढली आहे. लोकांना सहकार्य केले पाहिजे. महिलांच्या गुन्ह्याचा तपास करण्यासाठी खास पथक तयार केले आहे. त्यात ... व्यवस्थित गोळा करणे, ... संकलित करणे, तपास कसा करावा खरे व खोटे गुन्हे कोणते यासाठी ... पथक काम करणार आहे. तसेच, महिला अत्याचाराच्या गुन्ह्यासंदर्भात अभ्यास करण्यासाठी एसएनडीटी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना सांगण्यात आले होते. त्यांनी या गुन्ह्यांचा अभ्यास करून त्याचा अहवाल सादर केला ...

दामिनी पथकासह अभिनेत्री मृणाल कुलकर्णी

## ‘बडीकॉप देशपातळीवर राबविले जाणार’

महिलांसाठी पुण्यात चांगले उपक्रम सुरू झाले आहेत. त्यापैकी ‘बडीकॉप’ हा उपक्रम असून तो पूर्ण राज्यात राबविण्यात आला होता. या उपक्रमामुळे नोकरी करणाऱ्या महिलांना खूप मदत झाली. त्यामुळे हा चांगला उपक्रम आता राष्ट्रीय पातळीवर राबविण्यात येणार आहे,’ अशी माहिती पोलिस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम यांनी दिली.

# वाहतूक पोलिसांनी केली ४८ वाहनांवर कारवाई

# दामिनी पथकाकडून माणुसकीचे दर्शन

# पोलिसांच्या दक्षतेमुळे वाचले प्राण

# पोलिसांच्या सतर्कतेमुळे वाचले युवकाचे प्राण

# ...पाऱ्यानेच रचला होता दतीने दरोड्याचा बनाव

# कोल्हापुरात जेरबंद

# निल्या वाडकर खूनप्रकरणातील मुख्य आरोपी : सहा महिन्यांपासून होता...

# दुचाकी चोरणारे दोघे जेरबंद

# सहा जणांच्या टोळक्याला अटक

पंचवीस लाखांची चोरी करणारे २४ तासांत गजाआड

# कष्ट केल्यासच अभ्यास होतो

# ...पाऱ्याची ४ लाखांची बॅग सीसीटीव्ही मुळे परत

# Women cops chase dream jobs in Pune

# दामिनी पथकामुळे मिळाला पोटचा गोळा

हरवलेल्या मुलीची आई रंजना शिंदे यांची भावना

# हरवलेल्या ज्येष्ठाला पोलिसांनी केली मदत

माणुसकीची जाणीव

# पोलिसांच्या प्रयत्नामुळे तो सुखरूप घरी

पुण्यातून बेपत्ता झालेली व्यक्ती जेजुरीत आढळली

# पदोन्नत कर्मचाऱ्यांना कुटुंबीयांच्या उपस्थितीत फीत प्रदान सोहळा

पोलिस आयुक्त व्यंकटेशम यांचा अनोखा उपक्रम